स्नेह भोज
स्वाद दिल से दिल तक!
बारसे, डोहाळे जेवण, साखरपुडा, गेट टू गेदर
अश्या छोटेखानी समारंभांसाठी
परफेक्ट हॉल आणि सोबत
स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये
सुटसुटीत कार्यक्रम
रुचिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहमदनगर
86 98 8080 88




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




होय..आम्ही घेतोय आपल्या डोळ्यांची काळजी..
ऑप्टोमेट्रिस्टकडून डोळ्यांची दररोज मोफत तपासणी
एकदा अवश्य भेट द्या व खात्री कराच
▪ नंबरचा चष्मा फक्त रु. 299 रुपयात
▪ प्रोग्रेसिव्ह चष्मा फक्त रु. 900 रुपयात
▪ ब्लूकट चष्मा फक्त रु. 500 रुपयात
अहमदनगरचे सुप्रसिध्द
अंजली चष्मावाला
पत्ता : शिवशक्ती कॉम्प्लेक्स, पटेल मेडिकलजवळ, चितळेरोड, अहमदनगर, मो : 8796824353



रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. ०१.०५.२०२४ | अंक नं. ०५० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
खरेदीवर ५% कॅशबॅक ऑफर । बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग
संगमनेर ✆ (02425) 222226 | अ.नगर ✆ (0241) 2999299 | नारायणगाव ✆ (02132) 242132



offer offer offer... माफक फी
एक दिवशीय केक क्लास
बेसिक ते ॲडव्हान्स केक मेकिंग क्लास
एका दिवसात शिका १० केक प्रकार
बॅच रविवार, दि. ०१ मे २०२४
प्रवेश मर्यादित. अधिक माहितीसाठी संपर्क
वैष्णवीज् केक क्लासेस
सावेडी, अहमदनगर. मो./ व्हॉ. : 7768838027



शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
2 BHK चे
२ फ्लॅट
भाड्याने देणे
तेलीखुंट, पॉवर हाऊस
8623963979


# नगर शहरासह सावेडीत महिलांच्या गळ्यातील चेनस्नॅचिंगचे प्रकार सुरुच

## सकाळच्या वेळी विनाक्रमांकाच्या मोटारसायकलवरुन जाणाऱ्या चोरट्यांनी साधला डाव

नगर – नगर शहर परिसरात गेल्या महिनाभरापासून चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला आहे. मार्केट यार्ड, तारकपूर, केडगाव बायपास, सिव्हिल हडको परिसरात घडलेल्या घटना ताज्या असताना सोमवारी (दि.२९) सकाळी सावेडी उपनगरातील भिस्तभाग रोडवरील वृंदावन कॉलनीत एका पाठोपाठ २ महिलांच्या गळ्यातील दागिने विना क्रमांकाच्या मोटारसायकलवर आलेल्या एका चोरट्याने चोरून नेले आहे. त्यामुळे या चोरट्यांनी पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

या चेन स्नॅचिंगच्या २ घटनांबाबत २ महिलांनी तोफखाना पोलिस ठाण्यात वेगवेगळ्या फिर्यादी दिल्या आहेत. यातील पहिली फिर्याद गीता मुकुंद देशमुख (रा. श्रीनाथ कॉलनी, रासनेनगर, सावेडी) यांनी दिली आहे. त्या सोमवारी सकाळी ८.१० च्या सुमारास भिस्तबाग रोडवर पायी जात असताना त्यांच्या समोरून एका विना क्रमांकाच्या काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर एक जण आला. त्याने अचानक त्यांच्या जवळ मोटारसायकल नेत त्यांच्या गळ्यातील १ तोळा वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारून तोडून ते घेवून तो भरधाव वेगात निघून गेला. हा सर्व प्रकार अचानक घडल्याने फिर्यादी काही काळ गोंधळून गेल्या. त्यांनी आरडाओरडा केला मात्र नागरिक जमा होईपर्यंत चोरटा पसार झाला होता.

दुसरी फिर्याद रंजना विलास जतकर (रा. अशोक नगर, कलानगर जवळ, सावेडी) यांनी दिली आहे. त्या सोमवारी सकाळी ८.१० च्या सुमारास भिस्तबाग रोडवरील वृंदावन कॉलनीतील रस्त्याने मोपेडवर घराकडे चाललेल्या असताना त्यांच्या पाठीमागून एका विना क्रमांकाच्या काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर एक जण भरधाव वेगात आला. त्यांच्या जवळ आल्यावर त्याने मोटारसायकलचा वेग कमी करत त्यांच्या गळ्यातील १ तोळा वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारून तोडून ते घेवून तो भरधाव वेगात निघून गेला. या दोन्ही फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं.वि.कलम ३९२ प्रमाणे २ स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

### चोरटा एकच की अनेक याचा शोध घ्यावा लागणार

नगर शहर परिसरात गेल्या महिनाभरापासून चेन स्नॅचिंगच्या घटना वारंवार घडत आहेत. रस्त्याने चाललेल्या महिलांच्या गळ्यातील दागिने हे चोरटे हिसका मारून तोडून नेत आहेत. काही दिवसांपूर्वी मार्केटयार्ड मागील चैतन्य कॉलनीत सायंकाळी वॉकींगला चाललेल्या महिलेच्या गळ्यातील सव्वादोन तोळ्याचे सोन्याचे मंगळसुत्र पाठीमागून आलेल्या अनोळखी इसमाने बळजबरीने हिसका मारून तोडून नेल्याची घटना घडली होती. त्यानंतर पुन्हा तसाच काहीसा प्रकार तारकपूर परिसरात घडला. रस्त्याने पायी चाललेल्या शिक्षिकेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरट्याने पळविले.

त्यानंतर केडगाव बायपास रस्त्याने मोपेडवर चाललेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन चोरट्याने हिसकावून नेली. २ दिवसांपूर्वी रविवारी (दि.२८) सकाळी सिव्हिल हडको परिसरात मोपेड वर चाललेल्या महिलेचे सोन्याचे गंठण चोरट्याने हिसकावून नेले होते. या सर्व घटनांमध्ये चोरटा एकच असल्याने त्याने एकट्यानेच या चोऱ्या केल्या की, असे अनेक चोरटे शहरात सक्रीय आहेत. याचा शोध पोलिसांना घ्यावा लागणार आहे. वारंवार होणाऱ्या या घटनांमुळे शहर परिसरात महिलांना घराबाहेर पडणे मुश्कील झाले आहे. महिला वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी या चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.


एमआयडीसी, अहमदनगर येथील
नामांकित कंपनीसाठी पाहिजेत
* सीएनसी ऑपरेटर : १० * व्हीएमसी : १०
* ऑपरेटर : ५० (१०–१२ वी पास)
* प्रॉडक्शन सुपरवायझर : ०२ (बी.ई.)
इलेक्ट्रीक आणि मेकॅनिकल डिप्लोमा डिग्री
* क्वॉलिटी सुपरवायझर : ०२
8530973949, 9284039694



रूबी हॉल क्लिनिक, पुणे व लोपमुद्रा हॉस्पिटल, पाषाण पुणे येथील प्रथितयश व निष्णात

छाती (फुफ्फुस) विकार व ॲलर्जी विकार तज्ज्ञ
डॉ. स्नेहा तिरपुडे
MBBS, MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine)
Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरूवारी
आता आनंदऋषिजी हॉस्पिटल मध्ये !
मे महिन्यातील व्हिजीट : गुरूवार, 2 व 16 मे 2024
सकाळी 9 ते दुपारी 2 वाजेपर्यंत
लक्षणे : फुफ्फुसाचे सर्व आजार, झोपे संबंधीचे सर्व विकार, ॲलर्जी विकार, दमा, न्युमोनिया, न थांबणारा खोकला ही लक्षणे असल्यास त्वरीत संपर्क साधावा.
आनंदऋषिजी हॉस्पिटल
124, आनंदऋषिजी मार्ग, कोठी रोड, अहमदनगर
नांवनोंदणीसाठी संपर्क : 0241-2320473/74/75/76
9404399911 / 9404297411 राहुल घोलप : 9822031800 (कॉर्डिनेटर)
टिप : रूग्णांनी येतांना सर्व लॅब रिपोर्ट, एक्स रे, सीटीस्कॅन रिपोर्ट घेवून यावेत.



A.S.E. SOCIETY'S
(Linguistic Minority Educational Trust)
St. Vivekanand English School
Tarakpur, Ahmednagar. Ph. : 0241-2421999/2428866
WANTED

| Post | Qualification |
|---|---|
| Art, Craft & Drawing Teacher | ATD / G.D. Art |
| Maths / Science Teacher | B.Sc. B.Ed. H.Sc. D.Ed. |
| English / Social Studies Teacher | B.A. B.Ed. H.Sc. D.Ed. |
| Nursery Teacher | Graduate, Montessori Trained |
| Receptionist / Office Assistant | B.Com. |

The candidate should be computer savvy.
Only English oriented candidates need apply along with their handwritten application.
Walk in with your bio-data and testimonials.
Between 11:00 A.M. to 1:00 P.M.
(Note –The above appointments will be on contractual basis)
Mrs. Geeta Tambe, Principal | Mr. Gopal Bhagwani, Secretary | Mr. Ramchand Menghani, President



।।श्री आनंद गुरुवे नमः।।

कार्यक्रम की रुपरेखा

२ मई २०२४
सुबह
सुबह ७:३० बजे
प. पु. गुरुदेव का स्वागत
यश पॅलेस चौक
सुबह ८:१५ बजे
धर्म सभा के मंच पर गुरुदेव पधारेंगे
धर्म सभा : विषय - गुरु-भक्ति
उसके उपरांत
अर्हम बेबी वेलकम
दोपहर
दोपहर २ से ४ बजे
दर्शन का लाभ
दोपहर ४:३० से ५:३०
बहनों के लिए विषय:
आओ, रसोईघर को मंदिर बनाऐं
शाम
रात ८ से ९ बजे
प्रवचन का विषय:
आज और कल की चुनौतियां
४५ मिनट प्रवचन और
१५ मिनीट सवाल-जवाब

३ मई २०२४
सुबह
सुबह ८:३० से ९:३० बजे
प्रवचन का विषय:
दान, धरम और व्यवस्था
उसके उपरांत
गौतम निधी कलश संकलन
उसके उपरांत
गौतम निधी कलश वितरण
दोपहर
दोपहर २ से ४ बजे
दर्शन का लाभ
दोपहर ४:३० से ५:३० बजे
बहनों के लिए विषय:
आओ, रसोईघर को मंदिर बनाऐं
शाम
रात ८ से ९ बजे
प्रवचन का विषय:
स्ट्रेस मॅनेजमेंट
४५ मिनट प्रवचन और
१५ मिनीट सवाल-जवाब

४ मई २०२४
सुबह
सुबह ८:३० से १०:०० बजे
प्रवचन का विषय:
मेरा परिवार, मेरी ताकत
दोपहर
४ से ५ बजे
कृतज्ञता समारंभ

२ से ४ मई २०२४
स्थान
आनंद धाम, अ.नगर

मंगल आगमन
Arham Vijja
www.arhamvijja.org
आचार्य भगवंत राष्ट्रसंत पूज्य
श्री आनंदऋषीजी म.सा. के सुशिष्य
अर्हम विज्जा प्रणेता
उपाध्याय प्रवर
श्री प्रवीणऋषिजी म.सा.
आदि ठाणा २
महाराष्ट्र प्रवर्तक प.पु. कुंदनऋषिजी म.सा.
के सानिध्य में

One Voice

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## वर्षा गजेंद्र गडकरांच्या 'उजेड वाटा'

लेखिका गजेंद्र गडकरांच्या दै. सकाळमध्ये लिहिलेल्या सदरांचा नजराणा या पुस्तक रुपाने दिला आहे. वर्तमानपत्रात शब्द मर्यादेचं भान राखत अर्थधन लिहिणं फार अवघडही असतं.

नामवंतांच्या आयुष्यातले लहानसे प्रसंग घटना स्त्री-पुरुष, वर्ण-वंश या सगळ्या भेदांच्या पलीकडे जाणारे हे प्रसंग आहेत. काही अगदी लहानसे, काही खूप ठळक पण उजेडाची चिमूट सगळीकडे सारखीच. नकारात्मकतेनही काही घटनांनी प्रकाशाची तिरीप दाखवली आहे. मला-तुम्हाला त्या त्या प्रसंगांशी स्वत:ला सहज जोडून घेता येईल असं एक साधेपण आहे या सगळ्या छोट्या कथांमध्ये. त्यांमध्ये रसिकता आहे, औदार्य आहे. प्रतिभेची चमक आहे. प्रामाणिकपणा आहे. स्वाभिमान, साहस अन् अहंकारही आहे. या कथांमधला उजेड आपल्याला जगण्याची वाट दाखवेल, कधीतरी एखाद्या अवघड क्षणी तरुन जाण्याचं बळ देईल आणि यापेक्षाही मोलाचा असा कायम सोबत करणारा अतिशय उजळ आनंदही देईल.

आजकाल वाचनात फार वेळ मिळत नसला तरी (खरं तर आवड असेल तर सवड मिळतेच) १/२ पानांचे एक एक लेख वाचायला काय हरकत आहे. बघा पटतयं ना!

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



# सारडा कॉलेज वस्तीगृहाच्या 'त्या' जागेची विक्री, हस्तांतरण, भाडेपट्टा देण्यास धर्मादाय उपायुक्तांचा 'मनाई हुकूम' जारी

### हिंद सेवा मंडळाचे सदस्य वसंत लोढा, दीप चव्हाण, संजय घुले यांनी दाखल केलेला अर्ज मंजूर

नगर - पत्रकार चौकातील सारडा महाविद्यालयाच्या मुलांच्या वस्तीगृहाच्या जागेची विक्री, हस्तांतरण किंवा ही जागा कुणालाही भाडेपट्ट्याने देण्यास धर्मादाय उपायुक्तांनी मनाई हुकूम जारी केला आहे, अशी माहिती मंडळाचे सदस्य वसंत लोढा, दीप चव्हाण व संजय घुले यांनी पत्रकार परिषदेत दिली.



धर्मदाय उपायुक्तांच्या आदेशाबाबतची माहिती पत्रकार परिषदेत देताना वसंत लोढा, दीप चव्हाण व संजय घुले.

हिंद सेवा मंडळाचे सदस्य श्री. लोढा, चव्हाण आणि घुले यांनी नगरचे धर्मादाय उपायुक्त श्रीमती यु.एस.पाटील यांच्याकडे ज्येष्ठविधीज्ञ अभिजीत पुप्पाल यांच्यामार्फत अर्ज करून यांच्याकडे या जागेचा विक्री व्यवहार करू नये, यासाठी दावा दाखल केला होता. धर्मादाय उपायुक्त दाखल अर्ज क्रमांक १९५/ २०२४ नुसार धर्मादाय उपायुक्तांनी अर्ज मंजूर करीत हा मनाई आदेश दिला आहे. हिंद सेवा मंडळाच्या ताब्यात असलेली हॉटेल ओबेराय शेजारी असलेली सिटी सर्वे नंबर १६१/१ प्लॉट नंबर ४३अ मधील तीन एकर २९ गुंठे जागा कवडीमोल भावाने विकण्याचा घाट घालण्यात आला होता.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी स्थानिक धनदांडग्या लॅण्डमाफियांना हाताशी धरून भाडेपट्ट्याने हिंद सेवा मंडळाच्या ताब्यात असलेली ही मोक्याची जागा कवडीमोल भावात खिशात घालून कोट्यावधी रुपये कमवण्याचा कट रचला होता. मंडळाने यासाठी सर्वकाही कायदेशीरपणे चालले आहे असे दाखवण्याचा साळसूदपणा करत ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या या मंडळाच्या सदस्यांना खोट्या भूल थापा दिल्या. मंडळाने यासाठी २१ जानेवारी २०२४ रोजी खास सर्वसाधारण सभा आयोजित केली. त्या अगोदर ३ जानेवारी रोजी हिंद सेवा मंडळाच्या कार्यकारणीची बैठक घेण्यात आली. या जागेचा ताबा मंडळाने सोडावा आणि बदल्यामध्ये इमारत बांधून घ्यावी, अशा आशयाच्या अरुण बलभीम जगताप आणि हर्षल संतोष भंडारी यांच्या अर्जाबाबत या बैठकांमध्ये चर्चा झाली. कार्यकारिणीच्या बैठकीत हा अर्ज एकमताने मंजूर करण्यात आला. सर्वसाधारण सभेत देखील याला मंजुरी देण्यात आली. याला ब्रिजलाल सारडा, मकरंद खेर, अनंत देसाई, मधुसूदन सारडा, विष्णू सारडा, श्यामसुंदर सारडा यांनी विरोध केला होता. या विषयाला काही सदस्यांचा विरोध असताना हा विषय मंजूर करून कायदेशीर करण्याचा घाट घातला.

ही जागा सरकारी किंमत ३२ कोटी असताना ती २५ कोटी रोजी हस्तांतरित करण्याचा डाव टाकला. या जागेवर जर बांधकाम झाले तर चालू बाजार भावाप्रमाणे त्याची किंमत ४०० कोटी रुपयांच्या घरात जाते. ही जागा सय्यद हाजी हमीद तकिया ट्रस्ट बी-५० देवस्थानची इनाम वर्ग ३ ची असून, ही मिळकत हिंद सेवा मंडळाच्या ताब्यात अवघ्या ५०० रुपये प्रति वर्षाप्रमाणे आहे. १९६४ सालापासून मंडळाकडे असलेल्या या जागेचा करार आणखी ४० वर्ष शिल्लक आहे.

या जागेवर सारडा महाविद्यालयाचे विद्यार्थी वस्तीगृह होते. मंडळाने या वस्तीगृहाची इमारत मोडकळीस आल्यानंतर त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले आणि मोडकळीस आलेली इमारत पाडली. भूखंडाचे श्रीखंड करण्याचे कारस्थान मंडळाचे विश्वस्त अजित सीमरतमल बोरा यांनी रचले. त्यासाठी मंडळाचे अध्यक्ष पदाधिकारी आणि कार्यकारणी सदस्य यांची मदत घेण्यात आली. धर्मादाय आयुक्त व सय्यद हाजी हमीद तकिया ट्रस्ट बी-५० यांची परवानगी न घेता हा व्यवहार करण्यात आला. ताबा सोडण्याच्या बदल्यात सारडा कॉलेजला २५ कोटी रुपयांची इमारत बांधून देण्याचे ठरले. प्रत्यक्षात असे करता येते का? मंडळाला इतकी मोठी रक्कम वस्तू स्वरूपात जमिनीचा व्यवहार म्हणून घेता येते का? याची कोणतीही शहानिशा न करता बेकायदेशीरपणे संगणमताने कटकारस्थान रचून फसवणूक करण्याच्या दुष्ट हेतूने करण्यात आले.

या विरोधात वसंत लोढा, दीप चव्हाण आणि संजय घुले हे उभे राहिले. त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याची दखल घेतली गेली नाही म्हणून धर्मादाय श्रीमती यु. एस. पाटील धर्मादाय उपायुक्त अहमदनगर विभाग यांच्याकडे तक्रारी केल्या म्हणून अब्रूनुकसानीचा दावा दाखल करण्याची नोटीस पाठवण्यात आली. तरीदेखील या कथीत गैर व्यवहाराचा परदाफाश करण्याचा त्यांनी चंग बांधला. आणि एका चांगल्या शिक्षण संस्थेची मोक्याची जागा कवडीमोल भावात जे लोकप्रतिनिधी आपल्या खिशात घालण्याचा प्रयत्न करत आहेत त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. आता आयुक्तांनी या व्यवहाराचा मनाई आदेश जारी केला आहे आणि पालक म्हणून मंडळाच्या विश्वस्त आणि सदस्यांना निर्देश दिले आहेत, असे श्री.लोढा, चव्हाण, घुले यांनी सांगितले.

# अहमदनगर ऑटो ॲण्ड इंजिनिअरींग असोसिएशनच्या भूखंड रद्द व परत घेण्याच्या निर्णयास उच्च न्यायालयाची स्थगिती

नगर - अहमदनगर ऑटो ॲण्ड इंजिनिअरींग असोसिएशनच्या भुखंड रद्द करण्याच्या व परत घेण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निर्णयास औरंगाबाद उच्चन्यायालय खंडपीठाकडून स्थगिती देण्यात आली आहे.

सदरील प्रकरणात याचिकाकर्ते अहमदनगर ऑटो ॲण्ड इंजिनिअरींग असोसिएशनचे चेअरमन दौलत शिंदे यांनी त्यांना शासनाच्या समुह विकास योजनेअंतर्गत तत्कालीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १४ मे २०१६ चे वाटप पत्रान्वये याचिकाकर्ते यांना भुखंड क्रमांक ४७१५ क्षेत्र ८०६७ चौ. मी. चे वाटप ऑटो क्लस्टर या प्रयोजनाकरीता करण्यात आले.

सन २०१३ मध्ये मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्रमांक ६८/२०१३ दाखल करण्यात येऊन एम.आय. डी.सी. नागापूर येथील बेकायदेशिर भुखंड वाटप प्रकरणी आव्हान देण्यात आले. सदरील याचिकेत मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी बेकायदेशीर वाटप करण्यात आलेले भुखंड परत घेण्याबाबत आदेश देण्यात आले.

सदरील जनहित याचिकेमध्ये देण्यात आलेल्या निर्णयाविरुध्द मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे पुर्नयाचिका दाखल करण्यात आली. सदर पुर्नयाचिकेत उच्च न्यायालयाने आदेश देऊन सांगितले की, जे भुखंड कायदेशिररित्या वाटप करण्यात आले आहेत अशा भुखंडधारकाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आय.डी. सी. मुंबई यांनी चौकशी करुन ते नियमित करावेत असा आदेश देण्यात आला.

सदरील आदेशाप्रमाणे याचिकाकर्ते यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मुंबई यांना निवेदन देऊन त्यांचे भुखंड नियमित करण्याची विनंती केली. परंतू सदरील निवेदनाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी हे निर्णय घेत नसल्यामुळे रिट याचिका नं.८६१७/२२ दाखल करण्यात आली.

सदरील रिट याचिकेत मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आय.डी.सी. यांची ९० दिवसात निर्णय घेण्यास उच्च न्यायालयाने आदेश दिले. सदरील निर्णयाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहमदनगर ऑटो ॲण्ड इंजिनिअरींग असोसिएशन यांना वाटप करण्यात आलेला भुखंड जी-४७/५ हा रदद करुन भूखंड ताब्यात घेण्याची प्रक्रिया करण्याबाबत निर्णय दिला. सदर निर्णयाच्या विरोधात याचिकाकर्ते दौलत शिंदे यांच्या मार्फत रिट याचिका क्र.४०३०/२४ ॲड. विजय लटंगे मार्फत दाखल करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या ५/१/२०२४ च्या निर्णयास आव्हानित करण्यात आले.

सदरील याचिका न्यायमुर्ती रविंद्र घुगे व आर. एम. जोशी यांच्या समोर सुनावणीस निघाली असता न्यायालयाने सदरील निर्णयास स्थगिती देण्यात आली. पुढील सुनावणी ८ मे रोजी ठेवण्यात आलेली आहे. सदरील याचिकेत याचिकाकर्ते अहमदनगर ऑटो ॲण्ड इंजिनीअरींग असोसिएशनतर्फे ॲड. विजय लटंगे यांनी काम पाहिले तर एम.आय.डी.सी. तर्फे ॲड. एस. एस. दंडे यांनी काम पाहिले.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ६० हजारांच्या रोकडसह तिघांना पकडले

नगर - लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ६० हजारांची रोकड जवळ बाळगल्या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्टेशन रोडवरील एका हॉटेल मध्ये पोलिसांनी सोमवारी (दि.२९) सायंकाळी ही कारवाई केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही जण मोठी रोकड बाळगून असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली होती. या माहिती वरून पोलिसांनी एका हॉटेल मधील रूम मध्ये जावून तपासणी केली असता तेथे ६० हजारांची रोकड आढळून आली. त्यामुळे पो.कॉ. सतीश शिंदे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी राहुल बबन झावरे (रा.पारनेर), अनिकेत राजु यादव (रा. भिंगार), विलास गोविंद चिवडे (रा.मुंबई) यांच्या विरुद्ध भा.दं. वि.कलम १८८, १७१ (ई) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## बाळासाहेब तनपुरे यांचे आकस्मिक निधन

नगर - राहुरी तालुक्यातील वाघाचा आखाडा येथील रहिवाशी बाळासाहेब बाबूराव तनपुरे (वय ६७) यांचे ३० एप्रिल रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वाघाचा आखाडा विविध कार्यकारी सेवा संस्थेचे संचालक मेजर आदिनाथ व प्रमोद तनपुरे यांचे ते वडिल होत.

## श्रीमती बसंताबाई न्याती यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - सारसनगर येथील रहिवासी श्रीमती बसंताबाई मोतीलाल न्याती (वय ९०) यांचे ३० एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात नातवंडे, नात सुना असा परिवार आहे.

## संगमनेर महाविद्यालयचे प्राध्यापक पी. टी. कुलकर्णी यांचे निधन



नगर - संगमनेर महाविद्यालयाचे प्राध्यापक पी. टी. कुलकर्णी (वय ८०) यांचे नुकतेच पुणे येथे ह्रदयविकाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात १ मुलगा, १ मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर अंत्यसंस्कार संगमनेर येथील स्मशानभूमीत पार पडले.

# चार दिवसांत पाणी पुरवठा सुरु न झाल्यास आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन करणार

नगर - सध्या उन्हाळ्याची तीव्रता जाणवत असून, त्यामुळे शहरात पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. विशेषत: प्रभाग क्र.११ व प्रभाग क्र.१४ मध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पाणी पुरवठा कमी दाबाने व अपुऱ्या प्रमाणात होत आहे. तरी मनपाने चार दिवसात या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा प्रभागातील नागरिकांसह आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले व माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा आदि उपस्थित होते.

### प्रभाग क्र.११ व १४ मधील माजी नगरसेवकांची आयुक्तांना निवेदन देऊन चर्चा



पाणी पुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात आयुक्तांशी चर्चा करताना स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा आदी.

यावेळी आयुक्तांशी झालेल्या चर्चेत अविनाश घुले यांनी प्रभाग ११ व १४ मधील पाण्याची वस्तूस्थिती मांडतांना सांगितले, गेल्या काही दिवसापासून प्रभाग ११ मधील झेंडीगेट, हातमपुरा, धरती चौक, सथ्था कॉलनी, नवजीवन कॉलनी, मार्केट यार्ड तसेच प्रभाग १४ मधील बुरुडगांव रोड, विनायकनगर, माणिकनगर, सारसनगर आदिं भागात पाणी पुरवठ्याबाबत विस्कळीतपणा आलेला आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहे. मुळा डॅम येथे उन्हाळ्यातील पाण्याची स्थिती पाहता पाणी उपशासाठी एक्ट्रा पंपाची व्यवस्था केलेली आहे. परंतु ऐन उन्हाळ्यात तो पंपही नादुरुस्त झाला आहे. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. पाणी पुरवठा नियोजनाच्या आभावामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. तरी तातडीने यात सुधारणा व्हावी, अन्यथा नागरिकांसह आंदोलनाशिवाय पर्याय राहणार नाही.

याप्रसंगी गणेश भोसले म्हणाले, उन्हाळ्याची तीव्रता आणि पाण्याची टंचाई यांचे नियोजन प्रशासनाने करणे आवश्यक होते. परंतु प्रशासन पाण्यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतांना दिसून येतं आहे. गेल्या महिन्याभरापासून प्रशासनास याबाबत कळविण्यात आले. परंतु यात सुधारणा होतांना दिसत नाही. संबंधित अधिकारी व कर्मचारी उडवा-उडवीची उत्तर देत असून, पाणी प्रश्नांचे त्यांना गांभिर्य नाही. त्यामुळे सुधारणा न झाल्यास आंदोलनाशिवाय पर्याय नसेल.

# बाजारपेठेतील रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे अन्यथा महानगरपालिकेसमोर 'उपोषण' करणार

### नालबंद खुंट ते गंजबाजार रस्त्याच्या दुरावस्थमुळे नागरिक त्रस्त

नगर - शहरातील खराब रस्त्याचे काम तातडीने सुरू करून सदर प्रश्न निकाली काढावा अन्यथा महापालिकेसमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा मानव भारत अधिकार स्वरंक्षण समितीचे अध्यक्ष इम्रान बागवान यांनी दिला आहे.

या संदर्भात महापालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले असून त्यात बागवान यांनी म्हटले आहे की, प्रभाग क्र.११ मधील भंडारी बुक स्टॉल, नालबंद खुंट ते गंजबाजार हा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. त्यामुळे या रस्त्यावरून ये-जा करताना नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषत: येथील रहिवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या रस्त्यावर वारंवार अपघाताच्या घटना घडत आहेत. हा रस्ता अत्यंत वर्दळीचा असून नागरिकांसह शाळकरी मुले या रस्त्यावरून प्रवास करत असतात. सदर रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यात यावे. १५ ते २५ दिवसात प्रश्न निकाली न काढल्यास महापालिकेसमोर उपोषणास बसण्याचा इशारा बागवान यांनी दिला आहे.

यावेळी सोहेल बागवान, सागर होनराव, शेख जावेद, रियाज तांबोळी आदी उपस्थित होते.

## पुण्यस्मरण



रहने को सदा दहर में,
आता नहीं कोई..
तुम जैसे गए ऐसे भी,
जाता नहीं कोई...
आपकी याद हमेंशा
हमारे दिलों में रहेंगी...

स्व.अजिजभाई शेख (चष्मेवाले)
(स्व.दि.१/५/२००३)

आपल्या पुण्यस्मरणदिनी भावपूर्ण श्रध्दांजली !

- दुःखांकित -
शकूर शेख । मन्सूर शेख
स्थळ : शनी गल्ली, झेंडीगेट, अ.नगर

# नगरमधील बांधकाम व्यावसायिकाची ९९ लाखांची फसवणूक; विकसित करायला दिलेली जागा परस्पर दुसऱ्या व्यक्तींना विकली

नगर - नगर शहरातील तेलीखुंट भागातील जुनी इमारत पाडून त्या ठिकाणी नवी इमारत उभारण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाशी करार करून त्यांच्या कडून ९८ लाख ९९ हजार ८९१ रुपये घेवून ती जागा परस्पर दुसऱ्याच व्यक्तींना विकत बांधकाम व्यावसायिकाची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी ८ जणांवर कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बांधकाम व्यावसायिक अनिल बबनराव जाधव (रा.बोल्हेगाव फाटा, अहमदनगर) यांनी सोमवारी (दि.२९) रात्री उशिरा कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जाधव यांची दयानंद बिल्डर्स, डेव्हलपर्स या नावाची फर्म आहे. या फर्म मार्फत ते शहर व परिसरात बांधकाम तसेच जागा विकसित करण्याचे काम करतात. त्यांच्या फर्म सोबत दि.१२ ऑगस्ट २०२२ रोजी गिरीश प्रकाश लोखंडे, कांता प्रकाश लोखंडे, ज्ञानेश्वर मोहन लोखंडे, चंद्रकांत मनोहर लोखंडे, शोभा चंद्रकांत लोखंडे, पद्मा ज्ञानेश्वर लोखंडे आदींनी करारनामा करून त्यांची शहरातील तेलीखुंट येथील जुनी इमारत पाडून त्या जागी नवीन इमारत बांधण्यासाठी ती जागा अनिल जाधव यांच्या दयानंद बिल्डर्स, डेव्हलपर्स फर्मला दिली होती.

त्या बदल्यात या सर्वांनी जाधव यांच्या कडून ९८ लाख ९९ हजार ८९१ रुपये रोख व चेक स्वरुपात घेतलेले होते. त्यानंतर काही दिवसांनी या सर्वांनी त्या रकमेचा अपहार करत जाधव यांना वकिलामार्फत खोटी नोटीस पाठविली. नंतर त्यांचा विश्वासघात करत सदर जागा परस्पर पुणे येथील संतोष संभाजी नाळे व उदयसिंग माणिकसिंग ठाकूर यांना खरेदी खत करून विकली. तसेच जाधव यांना पैसे परत करण्यास नकार देत फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी ८ आरोपींच्या विरोधात भा.दं.वि.कलम ४२०,४०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन



दररोज
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट - भिस्तबाग चौक, झोपडी कॅन्टीन, तारकपूर, दिल्लीगेट, राज पॅलेस चौक, कायनेटिक चौक, केडगाव
पुणे ड्रॉप- वाघोली, खराडी बायपास, येरवडा, नवीन शिवाजीनगर बसस्टॅण्ड. बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज्
ऑफिस- चितळेरोड, अ.नगर
9657746555/ 9226399555

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### स्त्रि आरोग्यासाठी कोरफड

रोज सकाळी कोरफडीचा चमचाभर गर घेण्याने स्त्रियांच्या बाबतीत पाळी नियमित येण्यास मदत मिळते. अंगावरून कमी रक्तस्राव होत असल्यास किंवा पाळीच्या वेळेला गाठी पडून वेदना होत असल्यास कोरफडीचा गर घेणे उपयोगी ठरते.

## पाककला

### खसखसवाले आलू

**साहित्य** – पाव किलो बटाटे साले काढून, चवीप्रमाणे मीठ, कढीलिंबाची पाने अर्धा ते १ चमचा तिखट, सरसूचे तेल १ टेबलस्पून, खसखस भाजलेली १ टेबलस्पून, बारीक चिरलेली कोथिंबीर, १ हिरवी मिरची चिरून.

**कृती** – भाजलेली खसखस अर्धा तास पाण्यात भिजत घालावी व मिक्सरमध्ये बारीक वाटावी. कढईत तेल तापत ठेवून त्यात मिरची, कढीलिंब, हिंग व हळद घालावी. त्यावर बटाट्याच्या फोडी घालून चवीप्रमाणे मीठ घालावे. खसखशीचे वाटण व लाल तिखट घालून अर्धी वाटी पाणी घालावे. गॅस बारीक करून झाकण ठेवावे व बटाटा मऊ होईपर्यंत शिजवावे. वर कोथिंबीर व लिंबाचा रस घालावा.

## वास्तू

### मुख्य दरवाजासाठी

मुख्य दरवाजासमोर, बाहेर किंवा आत अडथळा येईल अशाप्रकारे कोणतीही वस्तू ठेवू नये.

## सल्ला

वेलदोडे सोलल्यावर त्याच्या साली टाकून न देता त्या गरम मसाला कुटताना त्यात वापरा किंवा चहाच्या पावडरीत मिसळा, चहाला स्वाद येतो.

## सौंदर्य

जर आपली त्वचा कोरडी व रखरखीत असेल तर दुधावरील साय घेऊन आपल्या चेहऱ्यावर, हातावर व शरीराच्या इतर भागांवर व्यवस्थित चोळा. स्नानापूर्वी शरीराच्या प्रत्येक भागाची मोहरीच्या तेलाने मालिश करा व स्नानाच्या पाण्यात जैतून व बदामाचे तेल २-४ थेंब मिसळा. यामुळे शरीर मुलायम, सुंदर होऊन उजळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १ मे २०२४

कालाष्टमी, महाराष्ट्र दिन, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, श्रवण २७।११

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**मेष** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. आरोग्य उत्तम राहील. मानसन्मानात वाढ होईल. महत्त्वाची कामे यशस्वीरीत्या पूर्ण होतील.

**वृषभ** : योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील. शत्रू पराभूत होतील. दृष्टीकोनात बदल केल्याने निश्चितच यश मिळेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. शत्रू पराजित होईल.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. आपल्या मुक्कामापर्यंत पोहोचण्यासाठी कठोर परिश्रम आणि धैर्याची आवश्यकता आहे.

**कर्क** : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रितीने कार्य करण्यास आपली मदत करेल. मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. अनुकूल बातम्या कळतील.

**सिंह** : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. नोकरदार व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे. भावनेच्या भरात वाहून नुकसान होण्याची शक्यता आहे.

**कन्या** : आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या. घरातील वातावरण आनंददायी राहील. मान-सन्मान वाढेल. आनंदाची बातमी मिळेल. आरोग्याची काळजी घ्या.

**तूळ** : योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. कौटुंबिक वाद-विवाद टाळा. मिळकतीपेक्षा अधिक खर्च होईल. सामाजिक कार्य काळजीपूर्वक करा.

**वृश्चिक** : आपल्याला कार्यालयामध्ये अथवा घरामध्ये आज थोडा मनस्ताप होण्याचा योग आहे. वाहने जपून चालवावीत. पत्नीच्या आरोग्याची चिंता राहील. आपल्या खर्चावर नियंत्रण ठेवा. शेअर्समध्ये गुंतवणुक करु नका. आर्थिक विषयांमध्ये सावध रहा.

**धनु** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. बाहेरचे पदार्थ, हॉटेलिंग वगैरे जपून करा. मागील उधारी वसुल होईल. कौटुंबिक सुख वाढेल. शत्रू पराभूत होतील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहाणार नाही. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**मकर** : मागील काही दिवसांपासून जे आपण नियोजन केलेले आहे ते आज फळास येईल. उपकरणे जपून वापरा. व्यापार-व्यवसायात जोखमीचे काम टाळा. प्रेम-प्रसंगांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक खर्च अधिक होईल.


**कुंभ** : बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागतील. कुटुंबियांचा सहवास लाभेल. नोकरदार कामात व्यस्त राहातील. नोकरदारांना अनुकूल वातावरण मिळेल. आरोग्य नरम-गरम राहील.

**मीन** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल. कर्ज देणे टाळा. निष्कारण चिंता त्रास देतील. राजकारणी व्यक्तींना उद्देशात यश मिळेल. महत्त्वाची कार्य पूर्ण होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# शब्दगंध क्र. ६९१४

सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अनंत; असंख्य; अगणित ३) कणखर; दणकट; तगडा ६) चोप; ताडन ७) एक समसंख्या; संवत्सरांची संख्या ८) भय; भीती ९) एक चर्मवाद्य; मृदंग; पणवानक ११) बीज; बियाणे १२) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक १३) वेतंड; हत्ती; गज १४) अलमारी १६) पडवी; ओसरी; ओवरी १७) दिसण्यात वेडसर १९) गुप्त शोध; टेहळणी २१) पवित्र, शुद्ध; मंगल २३) जमविणे; २४) मत्सर; द्वेष

**उभे शब्द :-** १) अगणित; अनंत; असंख्य २) परीक्षा; चाचणी; टेस्ट; कस ३) एक धान्य; संन्यासी वगैरे राहण्याचे ठिकाण ४) तळ; खालचा भाग ५) भाजीपाला (हिंदी) ७) शोभिवंत १०) गोलाकार फिरणारा वारा; चक्रवात १३) भाळ; ललाट १४) एक मांसहारी पदार्थ १५) बेकरीत तयार होणारा एक पदार्थ १६) शिडी; पायरी; जिना १८) डाक; मेल; पोस्ट २०) तळहात किंवा तळपाय २२) रान; जंगल; अरण्य

**शब्दगंध क्र. ६९१३ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भा | स्क | र | ■ | दा | वा | न | ल |
| ज | ■ | ज | ग | त | ■ | हा | ■ |
| प | र | क | र | ■ | क | णी | क |
| ■ | म | ■ | ज | व | ळ | ■ | पि |
| ओ | ण | वा | ■ | रा | स | ली | ला |
| ज | ■ | ग | ■ | त | ■ | ला | ■ |
| ■ | मा | णू | स | ■ | ग | व | त |
| क | न | क | ■ | प | ण | ती | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जो दुसऱ्याचे नुकसान कसे करावे हे जाणत नाही, त्यालाच परोपकारी म्हणून ओळखावे. – **मुरारी बापू.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### त्से त्से माशी म्हणजे काय?

तुम्ही म्हणाल काय बुवा हे नाव! त्से त्से माशी ही घरात नेहमी दिसणाऱ्या माशीसारखीच एक प्रकारची माशी आहे. त्से त्से माशी व घरातील माशी यांच्यात बरेच साम्य आहे. त्से त्से माशी अर्धा इंच लांब असते व तिचा रंग पिवळसर किंवा गडद तपकिरी असतो. कात्रीच्या पात्यांसारखे पंख असलेल्या या माशीची सोंड खूप तीक्ष्ण व मजबूत असते. या सोंडेनेच ही माशी चावते व त्वचेला छिद्र पाडून रक्त प्राशन करते. आपल्या सुदैवाने ही खतरनाक माशी आफ्रिका खंडात आढळते. आपल्याकडे ती दिसून येत नाही.

त्से त्से माशी सुमारे १०० दिवस जगते. ती अंडी न घालता सरळ अळ्यांनाच जन्म देते. त्से त्से माशी माणसांना, पक्ष्यांना किंवा प्राण्यांनाही चावतात. या माशा प्रामुख्याने दिवसाच चावे घेतात. या माशांमुळे 'स्लिपींग सिकनेस' या रोगाचा प्रसार होतो. 'ट्रिपॅनोसोमा ब्रूसी' नावाचे या रोगाचे जंतू त्से त्से माशीमुळे निरोगी माणसाच्या शरीरात प्रवेश करतात. अशा व्यक्तीला सुरुवातीला ताप येतो. तापासोबत शरीरातील लसिकाग्रंथी मोठ्या होतात, सूजतात. कालांतराने मेंदूवर परिणाम होतो. हा रोग झालेली व्यक्ती अशक्त होत जाते व वर्ष-दीड वर्षात मरण पावते. या गंभीर रोगाचे त्यामुळेच दूरगामी, सामाजिक व आर्थिक परिणाम होतात.

''नाकावरची माशी देखील उठत नाही'' असे आपण गमतीने म्हणतो. पण जर देश आफ्रिकेतला असेल आणि माशी 'त्से त्से' असेल तर मात्र खैर नाही. कारण अशी माशी आपल्या प्राणावरच बेतू शकते. त्से त्से माशा राहतात ती झाडेझुडपे नष्ट करून व डी.डी.टी., डायएल्ड्रीनसारख्या कीटकनाशकांचा वापर करून या माशीचा बीमोड करता येतो.

### फसवा मित्र

एका ठिकाणी एक बेडूक आणि उंदीर यांची ओळख होऊन त्यांची घनिष्ठ मैत्री जमली. बराच वेळ गप्पा मारीत एकमेकांची सुख-दुःखे ते एकमेकांना सांगत असत. बेडूक नेहमी उंदराच्या घरी जाऊन पाहुणचार झोडीत असे. तो उंदरालाही आपल्या घरी वारंवार बोलवीत असे, पण उंदीर कधी त्याच्या घरी गेला नाही.

एकदा बेडकाने आपल्या घरी येण्याचा फार आग्रह धरल्याने उंदीर म्हणाला, '' मित्रा तुझ्या घरचा रस्ता तर पाण्यातून जातो. मग मी कसा येऊ तुझ्या घरी? तेव्हा बेडकाने आपल्या एका पायाला उंदराला बांधून त्याला आपल्या घरी घेऊन जाऊ लागला. अर्धे अधिक अंतर गेल्यावर बेडकाला वाटले, या उंदराला असेच पाण्यात बुडवून मारले, तर अनायासे त्याच्या बिळातील अन्न आपल्याला फुकटात मिळेल. असा विचार मनात येताच बेडूक उंदराला पाण्यात बुडवू लागला असता उंदीर जिवाच्या भयाने मोठमोठ्याने आकांत करून ओरडू लागला. उंदराचा आवाज तेथूनच उडणाऱ्या घारीने ऐकला. तिने खाली पाहिले असता उंदीर तिच्या नजरेस पडताच झडप घालून तिने त्याला पकडले आणि ती आकाशात उडाली. उंदराचा पाय बेडकाच्या पायाला बांधला असल्याने तोही आयताच घारीच्या तावडीत सापडला. अशा प्रकारे उंदराबरोबर घारीने त्यालाही खाऊन टाकले.

**तात्पर्य** : वाईट कृत्याचे प्रायश्चित्त मिळतेच मिळते.



## जीवन चक्र

यदि हमने लोगों को प्रसन्न कर दिया, तो समझो कि हमने कुछ नहीं पाया। यदि हम धन कमाने के चक्कर में लगे रहे, नाम कमाने के चक्कर में लगे रहे और घर-गृहस्थी में लगे रहे, अपने व्यापार में लगे रहे और इस दुनिया का जो भी हम पा सकते हैं, उसको पाने में लगे रहे, तो हम यह न सोचें कि हमने बहुत बड़ी कमाई कर ली है। गुरु अर्जनदेव जी महाराज यही फरमा रहे हैं कि इन चीज़ों को अगर हमने पाया, तो हम जान लें कि हमने कुछ नहीं पाया। हमें क्या पाना है? उस सच को पाना है जो आज भी सच है कल भी सच था और आगे भी सच रहेगा। वह क्या है? वह प्रभु का शब्द है, जिसे नाम कहा गया है, Holy Word कहा गया है, Logos कहा गया है, कलमा कहा गया है, Sonorous Light कहा गया है, Voice of Silence कहा गया है। यदि सचाई के साथ जुड़ेंगे, उस सचाई के साथ लगेंगे, जो प्रभु के साथ जुड़ी है, तभी हम कुछ अपने लिए कमा सकेंगे। नहीं तो हम काम, क्रोध, मोह, लोभ और अहंकार के चक्कर में फंसे रहेंगे। यदि हम सचाई के साथ जुड़ जायेंगे, तो हमारा अहंकार नष्ट हो जाएगा और हम एक नम्रता से भरी हुई जिंदगी जीना शुरू कर देंगे। जब हम पूजा-पाठ करते हैं, तो हमारा मस्तक ख़ुद-ब-ख़ुद क्यों झुक जाता है ? इसलिए कि हम प्रभु को याद करते हैं, उन्हें सच्चा समझते हैं और उनकी शरण में जाना चाहते हैं। यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज हमें समझा रहे हैं कि जब हम सचाई के साथ जुड़ते हैं, उस नाम के साथ जुड़ते हैं, जो सदा-सदा के लिए था, सदा-सदा के लिए है और सदा-सदा के लिए रहेगा, तो जो हमारी ख़ुदी है, अहंकार है, वह अपने आप नष्ट हो जाता है। जैसे-जैसे हम नाम के साथ जुड़ते जाते हैं, वैसे-वैसे 'मैं' हमारे से हटना शुरू हो जाती है। संत दर्शनसिंह जी महाराज ने इसी भाव को अपने एक शेर में समझाया है, बयान किया है। वे फरमाते हैं : **किस का दर है कि जीं आप झुकी जाती है**

**दिले खुद्दार! तेरी आन मिटी जाती है।**

– मताओ नूर, ग़ज़ल-५३

यही विचार उन्होंने हमें दिया है कि वह कौन सी जगह है जहाँ जबीं (गर्दन, सिर) अपने आप झुकी चली जाती है और हम इंसान, जो बहुत घमंडी हैं, अहंकार से भरे हैं, हमारी आन (अहंकार) ख़ुद-ब-खुद मिटती चली जाती है। जैसे-जैसे हम सचाई के साथ जुड़ते हैं, नाम के साथ जुड़ते हैं, शब्द के साथ जुड़ते हैं, वैसे-वैसे हमारी ख़ुदी का नाश होता जाता है। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फरमा रहे हैं :

**जिस नो लाइ लए सो लागै ।**
**गिआन रतनु अंतरि तिसु जागै ।।**

जो परमात्मा के हुक्म से, उसकी मर्जी से, उसके भाणे से नाम के साथ लगता है,

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

भारत के प्राचीन योग के बारे में हम सब सुनते आये हैं परन्तु इस योग की अनुभूति अथवा प्राप्ति करने का समय अभी ही है। वर्तमान समय प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय के संस्थापक स्वयं सृष्टि के रचयिता बीजरूप शिव परमात्मा पिता ने अपने साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा द्वारा सहज राजयोग की शिक्षा दी है तथा उस योग द्वारा होने वाली प्राप्तियों के बारे में भी समझाया है, जिसका आज लाखों लोग लाभ ले रहे हैं। सभी का अनुभव कहता है कि सर्व समस्याओं का समाधान राजयोग ही है। योग युक्त होकर भोजन बनाने व खाने से तन और मन दोनों स्वस्थ हो जाते है। संसार में हरेक मनुष्य चाहता है कि मेरा जीवन सात्विक हो, मैं अच्छे कार्य करूँ, महान बनूँ और मेरे जीवन में शान्ति बनी रहे, परन्तु इच्छा होना एक बात है और उस इच्छा को साकार करने के लिए पुरुषार्थ करना दूसरी बात है। देखा गया है कि लोग चाहते कुछ है और करते कुछ और... । चाहते हैं शान्ति परन्तु परिस्थिति वश, संस्कार वश कर्म ऐसे कर बैठते हैं जिस कारण उनके अपने और दूसरों के जीवन में अशान्ति ही पैदा हो जाती है। चाहते हैं स्नेह और प्रेम लेकिन बात ऐसी कर लेते हैं जिससे गलतफहमी, मनमुटाव, संघर्ष और नफरत को बढ़ावा मिलता है। चाहते हैं कि स्वास्थ्य अच्छा हो परन्तु सात्विक अन्न की कमी के कारण शरीर में स्वास्थ्य नाशक, रोगोत्पादक तथा उत्तेजनात्मक विषैले तत्व इकट्ठे होने लगते हैं। जो न केवल शरीर के लिए हानिकारक होते हैं बल्कि मानसिक सन्तुलन को भी बिगाड़ते हैं। निर्णयशक्ति को विचलित कर देते हैं, मानसिक आवेग को अनियंत्रित, असन्तुलित, अमर्यादित या दिशा भ्रष्ट कर देते हैं इसलिए मनुष्य के आहार का उसके आचार विचार और व्यवहार से गहरा सम्बन्ध है।

प्राचीनकाल से यह कहा जाता है कि अन्न का मन पर प्रभाव पड़ता है और मन का स्वास्थ्य व रोगों से गहरा सम्बन्ध है। कहते हैं, जैसा अन्न वैसा मन, जैसा मन वैसा तन इसलिए तनावमुक्त, व्यसनमुक्त, चरित्र सम्पन्न जीवन जीने के लिए भोजन का अकथनीय महत्व है। सभी मनुष्यों का लक्ष्य यही है कि हम शान्त, शीतल और सात्विक वृत्ति को धारण कर सुखमय व आनंदित जीवन जीये और इस लक्ष्य तक पहुँचने के लिए मन को वश करना आवश्यक है। मन को वश करने के लिए हमें अन्न की परहेज पर ध्यान देना बहुत जरुरी है। ऐसे समय पर सात्विक और पौष्टिक अन्न का निर्माण करने के लिए शाश्वत यौगिक खेती पद्धति बहुत ही लाभदायक है।

भारत के प्राचीन योग के बारे में हम सब सुनते आये हैं परन्तु इस योग की अनुभूति अथवा प्राप्ति करने का समय अभी ही है। वर्तमान समय प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय के संस्थापक स्वयं सृष्टि के रचयिता बीजरूप शिव परमात्मा पिता ने अपने साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा द्वारा सहज राजयोग की शिक्षा दी है तथा उस योग द्वारा होने वाली प्राप्तियों के बारे में भी समझाया है, जिसका आज लाखों लोग लाभ ले रहे हैं। सभी का अनुभव कहता है कि सर्व समस्याओं का समाधान राजयोग ही है। योग युक्त होकर भोजन बनाने व खाने से तन और मन दोनों स्वस्थ हो जाते है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!


**पेशंट :** विचित्र आजार झालाय... जेवणानंतर भूक लागत नाही, सकाळी उठल्यावर झोप लागत नाही...काम केल्यावर थकवा येतो काय करू?

**डॉक्टर :** रोज रात्री उन्हात बसा.

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

तुझ्या डोळ्यांचा पाहुणा म्हणून
त्यास घरात घेऊ नकोस
परंतु तुझे हृदय जेव्हा पुकारील
तेव्हाच त्याला आत येऊ दे



**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

विचारताना 'अग बाळा, रस्त्यात काही अडचण आली का? सायकल पंक्चर झाली होती का? उशीर कशामुळे झाला?' असे प्रेमाने आपुलकीने विचारा. आपल्या मुलीशी मैत्रिपूर्ण संबंध ठेवा. एखाद्या बाहेरच्या व्यक्तीने केलेला अत्याचार सांगण्याचे धाडस तिच्यामध्ये असायला हवे. त्याकरिता सुरक्षित वातावरण असायला हवे. आपल्या मुलीच्या मित्रमैत्रिणींची माहिती हवी. या वयातील मुलींना योग्य स्पर्श व अयोग्य स्पर्श याबद्दलचे ज्ञान द्यावे. जर अशा घटना घडल्या तर विश्वासपूर्वक सांगायला लावाव्यात. यामुळे खरोखरच आपल्या मुलीचा कोणी गैरफायदा घेत असेल तर वेळीच लक्षात येईल. या वयातील मुलींना आईने समजून सांगावे, की 'हे वय अभ्यास, आपले छंद जोपासणे, पुस्तकांचे वाचन आणि पुढील आयुष्याला दिशा मिळण्यासाठी महत्त्वाचे आहे. या वयात आकर्षण असते. परंतु त्यावर ताबा मिळवायला हवा. आयुष्यामध्ये प्रत्येक गोष्टीची वेळ ठरलेली असते. अजून तू खूप लहान आहे. शिक्षण संपल्यावर आयुष्याचा जोडीदार शोधायचा.' योग्य वेळेस मुलींना या गोष्टी सांगितल्या तर मुली चुकीचे पाऊल टाकत नाहीत. परंतु आपल्याकडे या विषयावर मार्गदर्शन मिळत नाही ही खेदजनक बाब आहे.

ते खेळते असते, आईवडिलांचे नाते प्रेमपूर्ण असते, भाऊबहिणींमध्ये मायेचे वातावरण असते, एखाद्या छंदासाठी घरातून प्रोत्साहन मिळत असते, मुलीच्या भावना समजून घेतल्या जात असतील त्या घरातील मुलींचे लक्ष स्वत:च्या व्यक्तिमत्त्व विकासावर आणि करिअर करण्यावर केंद्रित केले जाते. सीमालाही मी काय योग्य आणि अयोग्य हे समजावून सांगितले. मी तिच्याशी आपुलकीने बोलायला लागल्यावर सीमा जोरजोरात रडायला लागली. सॉरी मॅडम! अशी चूक माझ्या हातून परत होणार नाही. असे आश्वासन तिने दिले. कौशल्याबाईंनाही त्यांची चूक कळली. त्यांनी तिला ब्युटीपार्लर आणि शिवणकामाचा कोर्स पूर्ण करायला लावला. आज सीमा एक नामांकित ब्युटीपार्लर आत्मविश्वासाने चालवत आहे.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# प्रविणऋषीजी म.सा. यांचा २ ते ४ मे दरम्यान नगरमध्ये विहार

## आनंदधाम येथे प्रवचन, दर्शन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे सुशिष्य तथा अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा. २ ते ४ मे दरम्यान नगरला येणार आहेत. तीन दिवस त्यांचे आनंदधामच्या पवित्र प्रांगणात विहार असणार असून श्रावक श्राविकांना त्यांच्या सान्निध्याचा लाभ मिळणार आहे, अशी माहिती आयोजक नरेंद्र फिरोदिया व सुनील मुनोत यांनी दिली.



२ मे रोजी सकाळी ७.३० वाजता प्रविणऋषीजी म. सा. यांचे यश पॅलेस चौकात आगमन आणि स्वागत होईल. यानंतर सकाळी ८.१५ वाजता आनंदधाम येथे त्यांची गुरू भक्ती विषयावर धर्म सभा होणार आहे. दुपारी २ ते ४ यावेळेत त्यांच्या दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येईल. सायंकाळी ४.३० ते ५.३० यावेळेत ते महिलांना 'आवो रसोई घर को मंदिर बनाये' याविषयी मार्गदर्शन करतील. रात्री ८ ते ९ यावेळेत 'आज और कलकी चुनौती' या विषयावर त्यांचे प्रवचन होणार आहे. यात १५ मिनिटे प्रश्नोत्तरे असतील.

३ मे रोजी सकाळी ८.३० ते ९.३० यावेळेत 'दान, धर्म आणि व्यवस्था' या विषयावर त्यांचे प्रवचन होणार आहे. यानंतर गौतम निधी कलश संकलन आणि गौतम निधी कलश वितरण कार्यक्रम होणार आहे. दुपारी २ ते ४ यावेळेत त्यांच्या दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येईल. सायंकाळी ४.३० ते ५.३० यावेळेत महिला भगिनींना दर्शनाचा लाभ मिळणार आहे. यावेळी 'आवो रसोई घर को मंदिर बनाये' याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. रात्री ८ ते ९ यावेळेत स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावर त्यांचे प्रवचन होणार आहे. यात १५ मिनिटे प्रश्नोत्तरे असतील.

४ मे रोजी सकाळी ८.३० ते १० या वेळेत 'मेरा परिवार मेरी ताकद' या विषयावर प्रवचन होणार आहे. दुपारी ४ ते ५ यावेळत प्रविणऋषीजी म.सा. यांचा कृतज्ञता समारंभ होणार आहे. प्रविणऋषीजी म.सा. बऱ्याच कालावधीनंतर नगरला आचार्यश्रींच्या भूमीत आनंदधाम येथे येत आहेत. त्यामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. त्यांच्या स्वागताची जोरदार तयारी करण्यात आली आहे. तीन दिवस त्यांचे सान्निध्य आणि मार्गदर्शन भाविकांना मिळणार आहे. या कार्यक्रमांना श्रावक श्राविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा आगामी चातुर्मास छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

# डॉ. ज्ञानप्रभाजी म.सा. यांच्या दिक्षा जयंतीनिमित्त बुधवारी सारसनगर जैन स्थानकात विविध कार्यक्रम

नगर – श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, सारसनगर यांच्या वतीने संथारा व्रत साधिका, महाराष्ट्र प्रवर्तिनी डॉ. ज्ञानप्रभाजी म.सा. यांच्या ६७ व्या दीक्षा जयंतीनिमित्त १ मे रोजी जाप, प्रवचन, आराधना कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.



शिवगंगा टॉवर मागील जैन स्थानकात राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा., आचार्य प्रवर डॉ. शिवमुनीजी म.सा. यांच्या आज्ञानुवर्तिनी, महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., प्रवर्तिनी डॉ. ज्ञानप्रभाजी म.सा. यांच्या सुशिष्या पुष्पचुलाजी म.सा. ठाणा –८ यांच्या सान्निध्यात हे कार्यक्रम होणार आहेत.

सकाळी ८.३० ते ९.४५ यावेळेत जाप व प्रवचन, दुपारी ३.३० ते ४.३० यावेळेत पुच्छींसुणं आराधना होईल. कार्यक्रमात लकी ड्रॉ व प्रभावनेचे लाभार्थी कु. स्मिता नवीनचंद गोसलिया (मुंबई, घाटकोपर) व नरपतराज अचलचंद लुंकड (पाली, राजस्थान) हे परिवार आहेत.

भाविकांनी या कार्यक्रमांना उपस्थित रहावे असे आवाहन सारसनगर जैन श्रावक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.



नगरमधील स्मॅश टेबल टेनिस ॲकॅडमीमध्ये जागतिक टेबल टेनिस दिवस साजरा करुन विजेत्या खेळाडूंना बक्षीसे देण्यात आली.

# स्मॅश टेबल टेनिस ॲकॅडमीमध्ये जागतिक टेबल टेनिस दिवस साजरा

नगर – अहमदनगरमधील स्मॅश टेबल टेनिस अक्ॅडमीतर्फे जागतिक टेबल टेनिस दिन नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या दिवशी वेगवेगळ्या गटासाठी टेबल टेनिसच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी अहमदनगरमधील खेळाडूंनी उत्तम प्रतिसाद दिला.

२३ एप्रिल रोजी जागतिक टेबल टेनिस दिवस पूर्ण जगात साजरा केला जातो. अहमदनगरमधील स्मॅश टेबल टेनिस अक्ॅडमीतर्फेही टेबल टेनिस स्पर्धांचे आयोजन करून हा टेबल टेनिस दिवस साजरा करण्यात आला. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना बक्षिसे देण्यात आली.

# निमगाव वाघात गुरुवारी श्री बिरोबा महाराज यात्रोत्सवाचे आयोजन

## बिरोबा मंदिराला रंगरंगोटी व विद्युतरोषणाईची सजावट

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार (दि.२ मे) गावात यात्रा उत्सव व शुक्रवारी (दि.३ मे) कुस्त्यांचे मैदान घेण्यात आले असून, संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल–उरुस होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.



निमगाव वाघा येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या मंदिरातील मूर्ती

नुकतेच गावातील युवकांनी गंगाजल आणण्यासाठी रविवारी (दि.२८ एप्रिल) रात्री पारंपारिक वाद्यांसह मिरवणूकीने कावड घेऊन प्रवरा संगमकडे प्रस्थान केले. गावातील युवकांचा जथ्था कावडी घेवून गुरुवारी यात्रेच्या दिवशी सकाळी ८ वा. गावात परतणार असून, मोठ्या उत्साहात कावडीची गावामधून डफ, ढोल, ताशे व लेझीम पथकासह मिरवणूक काढली जाणार आहे.

सकाळी १० वाजता श्रीबिरोबा महाराजांच्या मूर्तीस गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा केली जाणार आहे. तर मागील वीस वर्षापासून कावडीने गंगाजल आणण्यासाठी जाणाऱ्या युवकांचा सन्मान ग्रामस्थांच्या वतीने केला जाणार आहे. सालाबाद प्रमाणे होणाऱ्या यात्रोत्सवानिमित्त मोठ्या संख्येने जिल्ह्यातील भाविक दर्शनासाठी येत असतात. यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ९ वाजता छबीना मिरवणूक काढली जाणार आहे. यावेळी फटाक्यांच्या आतषबाजीत आसमंत उजळून निघणार आहे.

यात्रेनिमित्त गावातील बिरोबा मंदिराला रंगरंगोटी करून व आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी गावात कुस्त्यांचे मैदान रंगणार आहे. तर संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल–उरुस होणार आहे. गावातील यात्रा व संदल–उरुसच्या कार्यक्रमातून धार्मिक एकतेचे दर्शन घडणार आहे.

या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थांना उपस्थित राहण्याचे आवाहन देवाचे भगत नामदेव भुसारे, ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै.नाना डोंगरे, बाबा जाधव, अनशाबापू शिंदे, बाबा पुंड, बबन कापसे, रामदास वाखारे, पांडूरंग गुंजाळ, बशीर शेख, संजय डोंगरे, ठकाराम शिंदे, अंबादास निकम, मेजर शिवाजी पुंड, बबन शेळके, संदीप डोंगरे, भानुदास ठोकळ, वसंत फलके, संजय कापसे, गुलाब केदार, वैभव फलके, किरण जाधव, नवनाथ जाधव, रावसाहेब भुसारे, राजू शेख, दिलावर शेख, आदम शेख आदींनी केले आहे. यात्रा उत्सव व संदल–उरुस यशस्वी करण्यासाठी गावातील ग्रामस्थ परिश्रम घेत आहे.

# ११०० दाम्पत्यांसह अरणगावमधील श्रीकृष्ण मंदिरात श्री पंचावतार महापूजा सोहळा

## ५ ते १२ मेपर्यंत दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

नगर – नगर तालुक्यातील अरणगाव येथील श्रीकृष्ण मंदिरात कलशारोहण सोहळ्यानिमित्त ११०० दाम्पत्यांसह श्री पंचावतार महापूजा सोहळा, तसेच दीक्षा विधी कार्यक्रमाचे आयोजन ५ ते १२ मे पर्यंत करण्यात आले आहे. राज्यासह सूरत (गुजरात) मधील दाम्पत्य या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

या सोहळ्यानिमित्त महंत आचार्य बाभूळगावकर बाबा शास्त्री, करमाड यांच्या समधूर वाणीतून संगीत श्रीमद्भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे, तसेच पोथीप्रवाचक मं. आचार्य न्यायंबास बाबा शास्त्री (मकर धोकडा) यांचे पोथी प्रवचन होईल. दररोज सकाळी ९ ते ११.३० पर्यंत विविध संतमहंतांचे विविध विषयांवर प्रवचन होईल. भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चक्रपाणी महानुभाव आश्रम, अरणगावचे संचालक आचार्य निमगावकर बाबा उपाख्य राजेंद्र मुनी विराट यांनी केले आहे.



राजेंद्र मुनी विराट

ॲड. बाबासाहेब रणसिंग, इंजि. चंद्रशेखर जगताप, भगवान अनारसे, देवा धोंडे, पुरुषोत्तम भोसले, पंचकृष्ण उत्सव सेवा समिती व सर्वज्ञ युवा सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य मंदिर कलशारोहण सोहळा कमिटी सदस्य, अरणगाव ग्रामस्थ आदींनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले आहे.

# राधाकृष्ण मंदिर सारसनगर येथे मुला- मुलींसाठी संस्कार शिबीर

नगर – सालाबाद प्रमाणे या वर्षी राधाकृष्ण मंदिर सारसनगर येथे १ ते १० मे पर्यत वय वर्ष ३ ते १५ या वयोगटातील मुला– मुलीं साठी संस्कार शिबीर आयोजित केले आहे.

आजच्या आधुनिक विज्ञानाच्या काळात बाल वयात तंत्रज्ञानाच्या शिक्षणाबरोबरच हिंदू धर्माचे ज्ञान असणे ही आवश्यक आहे. आजच्या घडीला हिंदूधर्माचे ज्ञान व त्याचे महत्त्व माहिती असणे गरजेचे आहे.या शिबीरात आपल्या धर्म ग्रंथाची माहिती, कपाळाला गंध का लावायचे याचे महत्त्व तसेच भगवतगीतेतील एक आध्याय पाठांतर करूनच घेतला जाईल. जुने खेळ शिकवले जातील,

तरी या संस्कार शिबिरात नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी प्रभाताई भोंग ९८९६०४४४७ यांच्याशी संपर्क साधावा.

# अवतार मेहेरबाबा ट्रस्टतर्फे कंपौंड येथे १ मे रोजी चलचित्रफित दाखविणार

नगर – मेहेर नझरम धील अवतसार मेहेरबाबा फिल्मस् नगर केंद्रातर्फे अवतार मेहेरबाबा ट्रस्ट कंपौंड मेहेर नझर गेट, भारत पेट्रोल पंप आणि फोस मोटर्स सरोष थिएटरजवळ येथे १ मे रोजी सायं.७ ते ९ वेळेत नि:शब्द चलचित्रफित दाखविण्यात येणार आहे.

मेहेरबाबा १९६० दर्शन: खुशरु क्वार्टर्स आणि पुणे येथील अवतार मेहेरबाबांचे बंधु जाल एस. ईराणी यांची अहमदनगर आणि पुणे येथील बनविलेली उत्कृष्ट निःशब्द चलचित्रफित.

**मेहेराबाद – सुरुवात** – ३० मिनीटांची एक आकर्षक फिल्म ज्यात मेहेरबाबांची प्रथम अरणगांव येथील भेट आणि ग्रामीण भागातील राहणे जे मेहेराबाद म्हणुन ओळखले जाते. पीटर नॉर्डीन आणि बॉब फ्रेडरिक ज्यांनी मेहेर बाबांच्या शतकातील ४ मे १९२३ मधील प्रथम भेटीचे ज्यात या ऐतिहासिक स्थळाचे आणि पुढे जागतिक किर्तीचे यात्रास्थळ झालेले आहे त्याचे कथन होय.

नुसरत फतेह अलि खान – १९८५ मधील इंग्लड येथील कार्यक्रम – मेहेरबाबांना भक्तीमाध्यमातील कव्वाली अतिशय आवडत. नुसरत फतेह अलि खान हे त्यापैकीच एक महान कलाकार होय.

अवतार मेहेर बाबा – त्यांच्या जीवन, कार्य आणि संदेशावरील ठळक माहिती – मेहेरबाबांचे एक उत्कृष्ठ ओळख ज्यात बाबांच्या जीवन, कार्य आणि आध्यात्मिक कार्याबद्दल माहिती होय. पीटर बुथ ज्यांनी याचे संकलन आणि संपादन केले आहे आणि मेहेराबाद, महाराष्ट्र, भारत येथील जुने रहिवासी होय.

# नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिक कर्जावरील १ एप्रिल २०२३ पासून वसुल व्याज जिल्हा बँक परत करणार

नगर – अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभासद प्राथमिक वि.का. सेवा सहकारी संस्थांनी ज्या पिक कर्जदार सभासदांकडील नियमित पिक कर्ज परतफेड करणाऱ्या सभासदाकडील ३ लाखापर्यतचे कर्जावरील १/३/२०२४ ते ३१/३/२०२४ पर्यंत वसुल केलेले व शासनाच्या व्याज परताव्याच्या धोरणा प्रमाणे सन २०२३–२०२४ चे व्याज परताव्यास पात्र असलेले कर्जदार शेतकरी सभासदांना परत करण्याचा बँकेने निर्णय घेतला होता त्या पध्दतीने जिल्हयातील बहुतांश कर्जदार शेतकरी सभासदांना वसुल व्याज बँकेने परत केले असुन आता शेतकऱ्यांच्या मागणीनुसार १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत पिक कर्ज वसुल व्याजही कर्जदार शेतकऱ्यांना परत करण्याचा महत्वपुर्ण निर्णय जिल्हा बँकेच्या कार्यकारी कमिटीच्या सभेत घेण्यात आल्याची माहिती बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले यांनी दिली.



चेअरमन शिवाजीराव कर्डीले

बँकेने १/३/२०२४ ते ३१/३/२०२४ पर्यंतचे पिक कर्ज वसुल व्याज परत पिक कर्जदार शेतकरी सभासदांना देण्याचे निर्णयानुसार जिल्ह्यातील १५४८४० शेतकऱ्यांना ७३ कोटी ८५ लाख रूपये संबंधीत सोसायटीच्या करंट खाती बँकेने जमा केले आहे. त्यापैकी ७४३९१ सभासदांचे सेव्हिंग्ज खाती ३७ कोटी ६१ लाख वसुल व्याज जमा केले आहे. उर्वरीत शेतकरी सभासदांनी आपली हमीपत्र संबंधीत सेवा सहकारी संस्था व शाखेस सादर करून त्यांनी आपले वसुल व्याज परत घ्यावे असे आवाहन शिवाजीराव कर्डीले यांनी करून ते पुढे म्हणाले की, १ एप्रिल २०२३ पासुन पिक कर्ज वसुल व्याज परत करण्याच्या निर्णयामुळे जिल्हयातील कोणताही शेतकरी यापासुन वंचित राहाणार नसुन जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सोसायटयांनी आता १ एप्रिल २०२३ पासुनचे वसुल पिक कर्जावरील वसुल व्याज परत करण्याचे प्रस्ताव सोसायट्यांनी बँकेच्या संलग्न शाखेत त्वरीत सादर करून शेतकरी सभासदांचे वसुल व्याज लवकरात लवकर व्याज परत करण्याच्या दृष्टीने सोसायट्यांनी अंमलबजावणी करावयाची आहे. बँकेने जिल्हयातील विविध कार्यकारी सेवा सोसायटी मार्फत शेतकऱ्यांना खरीप हंगामाकरीता १७९९९० शेतकरी सभासदांना १३८० कोटी ५६ लाखाचे नविन पिक कर्ज वाटप केले असुन बँकेकडून शेतकऱ्यांना त्वरीत कर्ज वाटपाचे कामकाज केले जात आहे, अशीही माहीती त्यांनी दिली.

# कलावंतानी साकारला शास्त्रीय नृत्यांचा सुंदर आविष्कार

## तीन जागतिक विश्व विक्रमांची नोंद; १३ तासांहून अधिक काळ सादरीकरण, आर्ट असोसिएट्सचा पुढाकार

या कार्यक्रमात अहमदनगरच्या कल्याणी कामतकर संचलित कथक नृत्यालय यांनी तसेच आर्मी पब्लिक स्कूल, अहमदनगर यांच्या एकूण ५० शिष्यवृंदांनी सहभाग नोंदवला. सलग ४८ मिनिटे विविध देव देवतांच्या कथा या सर्व कलाकारांनी नृत्यातून सादर केल्या. सर्व नृत्याची संरचना सौ. कल्याणी अमोल कामतकर (निसळ) यांनी केली असून, अहमदनगरमधील सर्व संगीत तज्ज्ञांचे शुभाशीर्वाद या उपक्रमास लाभले.



सौ. कल्याणी अमोल कामतकर (निसळ) व त्यांच्या सहकाऱ्यांनी शास्त्रीय नृत्याचा अविष्कार सादर करून ३ जागतिक विक्रमाची नोंद करून १३ तासांहून अधिक काळ सादरीकरण केले.

नाशिक कुठल्याही एका शास्त्रीय नृत्यापुरते सीमित न राहता भारतातील सर्व शास्त्रीय नृत्यांचा विचार करून, त्यांचा आवाका आणि त्यांची विविधता लक्षात घेऊन, त्यांना कथेच्या माध्यमातून प्रस्तुत करण्याचा सुंदर नृत्याविष्कार हा कलावंतानी सादर केला. या कार्यक्रमांद्वारे तीन जागतिक विश्व विक्रमांची नोंद झाली आहे. तेरा तासांहून अधिक काळ चाललेल्या या कार्यक्रमाद्वारे नाशिककरांना संगीतमय नृत्यकथांची एक अनोखी, अविस्मरणीय सफरच जणू घडली.

४२ व्या जागतिक नृत्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आर्ट असोसिएट्सतर्फे शंकराचार्य न्यास येथे या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाद्वारे आपल्या प्रगल्भ पौराणिक कथांच्या साठ्यातील काही मनमोहक कथा २८ वेगवेगळ्या समूहांकडून अप्रतिमपणे सादर झाल्या. तब्बल १३ तास ३७ मिनिट चालणारा हात दैदीप्यमान सोहळा, जवळपास ७००० पेक्षा अधिक लोकांनी वेगवेगळ्या माध्यमांतून आणि ५०० लोकांनी प्रत्यक्ष अनुभवला.

या सादरीकरणातील काही कथा काळजाला थेट भिडल्याने उपस्थित प्रेक्षकांच्या आनंदाने पाणावलेल्या डोळ्यांच्या कडा आणि चेहर्यावर अभिमानाने फुलून आलेले स्मित हे सगळ्यांनी अनुभवले. या कार्यक्रमात पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आपल्या खास व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून वंदे नटराजला उपस्थिती नोंदवली. त्यांनी या अनोख्या उपक्रमाबद्दल फक्त आर्ट असोसिएट्सच्या पदाधिकाऱ्यांचेच नव्हे तर आलेल्या प्रत्येक कलाकाराचे खूप कौतुक केले.

### सहा प्रकारातील शास्त्रीय नृत्यांचा आविष्कार

दि.२७ रोजी सकाळी शिववंदनेने सुरू झालेला हा नृत्यप्रवास कथक, भरतनाट्यम, ओडिसी, कुचिपुडी, मोहिनिहट्टम् आणि हत्रिय अश्या ६ प्रकारातील शास्त्रीय नृत्यांना कलावंतांनी एका पाठोपाठ सादर करत एका वेगळ्याच उंचीवर नेले. नृत्य आविष्काराची सांगता तांडव नृत्याने झाली. या नृत्यपर्वणीत सहभाग नोंदवायला महाराष्ट्रभरातून विविध गुरुकुलांमधील ४०४ कलाकार उपस्थित राहिले होते.

### तीन विश्व विक्रमांची घोषणा आणि आनंद

एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या वतीने सहभागी झालेल्या प्रतिनिधींनी २७ तारखेला विश्वविक्रम जाहीर केला. त्यासोबतच आज (ता.२८) वंडर बुक ऑफ रेकॉर्ड्स लंडनकडून देखील या विक्रमाला मान्यता देण्यात आली. अजून चौथ्या पुष्टीची आर्ट असोसिएट्स वाट बघत आहे. लवकरच ती बातमी द्यायलादेखील ते उत्सुक आहेत.

आर्ट असोसिएट्सच्या अमी छेडा, राधिका चावरे आणि तोरल टकले या तिघींनी त्यांच्या पाहिल्याच कार्यक्रमात यशाचे उंच शिखर गाठले. आर्ट असोसिएट्सची टीम आणि कलाकार या सर्वांनी प्रभु श्री रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिक नगरीत हा इतिहास घडताना पाहिला. प्रस्तुत झालेल्या संकल्पनेतून अनेक कलाकारांनी त्यांच्या लाडक्या रामाचे चरित्रदेखील नृत्याच्या माध्यमातुन उभे केले. हे शिवधनुष्य पेलताना शंकराचार्य न्यासचे आशिष कुलकर्णी, अमितभाई पटेल, आयकेआर द ट्रॅव्हल्स कॉन्पोनियन, फ्रावशी अक्ॅडमी, गार्गी बाय, पी अँन्ड जी, माय एफएम, शौनक गायधनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. नाशिकच्या पौराणिक इतिहासाला आज एक वेगळी परिभाषा या ६ वेगळ्या नृत्य फॉर्मच्या प्रस्तुतीतून लाभली हे मात्र नक्की.

या प्रोग्रॅमसाठी नगरमधील कलाकारांनी खूप मेहनत घेतली असून, अशाप्रकारचे विविध उपक्रम पुढेही घेणार आहोत, अशी माहिती कल्याणी कामतकर यांनी दिली. तसेच आर्ट असोसिएट्सचे खूप खूप धन्यवाद. त्यांनी ही बहुमूल्य संधी नृत्यालयास दिली. सर्व पालकांचेही आभार. त्यांनी दिलेल्या सहकार्यामुळे हा विश्वविक्रम करणे सोपे झाले.



# द लाईट चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंगचे आयोजन

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, अहमदनगर यांच्या वतीने द लाईट चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंग कॉन्प्लेक्स स्मार्ट थिएटर, कोहिनूर मॉल येथे ३० एप्रिल रोजी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी बी के राजेश्वरी, बी के प्रभा दीदी, बी के डॉ दीपक हरके, व बीके सदस्य उपस्थित होते. द लाईट चित्रपटात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचा स्थापनेपासून चा इतिहास एनीमेशन रुपात मांडण्यात आला आहे.

# भाजपा व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी महेश गुगळे, सरचिटणीसपदी हर्षल बोरा

नगर – भाजपा शहर जिल्हा व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी महेश गुगळे तर सरचिटणीसपदी हर्षल बोरा यांची नियुक्ती शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी केली आहे. त्याचे पत्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते देण्यात आले





आघाडीची इतर कार्यकारिणी पुढील प्रमाणे उपाध्यक्ष राजेश गुगळे, केडगाव मंडळ अध्यक्ष सुरेश लालबागे, भिंगार मंडळ अध्यक्ष लक्ष्मीकांत तिवारी, मध्य मंडल अध्यक्ष प्रशांत बोराडे, सहसंयोजक धीरज पोखरणा, उपाध्यक्ष प्रशांत बुऱ्हाडे, राजेश गुगळे, रुपेश वर्मा, संजय कांगला, विजय गांधी व चेतन कांकरिया, चिटणीस रवी साखला व निरज राठोड, कार्यकारणी सदस्य भरत जखोटिया, निलेश तुरे, अमित डोळसे, गौतम मंडल, प्रदीप रासने, दिनेश तलरेजा, सागर तीपोळे, सुधीर रासने, ओंकार रासने, मंगेश रासने.

यावेळी अभय आगरकर, वसंत लोढा, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सचिन पारखी, प्रशांत मुथा, गोपाळ वर्मा, महेश हेडा, बंटी ढापसे आदी उपस्थित होते

# जोश

# शोध एका 'न्यूटन'चा

**न्यूटनला कॉलेजमध्ये जाण्याची आणि तिथे गणिताचा अभ्यास करण्याची संधी मिळाली होती. पण त्याचवेळी त्याने 'डेलॉइट' कंपनीच्या ब्राइटस्टार्टमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. सध्या तो या कंपनीत ऑडिटर म्हणून काम करतो आणि तो तिथे भागीदारही आहे... हे कसे साध्य झाले? जाणून घेऊ या.**

आजकाल महिन्याला काही हजार रुपयांची नोकरी मिळवण्यासाठी लोकांना प्रचंड कष्ट करावे लागतात. त्यासाठी चांगले शिक्षण आणि विविध कलागुणांमध्ये पारंगत असणेदेखील अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र इंग्लंडमधील एक युवक या सर्व गोष्टींशिवाय दरमहा करोडो रुपये कमवत आहे. होय, ऐकून आश्चर्य वाटेल, पण हे खरे आहे. बेन न्यूटन असे या ३० वर्षीय युवकाचे नाव असून तो कधी कॉलेजला गेला नव्हता. तरीही, आज तो चांगली नोकरी करत आहे आणि सुखवस्तू जीवन जगत आहे. चला तर, या भाग्यवान व्यक्तीची कहाणी जाणून घेऊ या.


न्यूटनची कहाणी १२ वर्षांपूर्वी सुरू झाली, जेव्हा त्याने डेलॉइटच्या ब्राइटस्टार्स प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेतला होता. तेव्हापासून तो या कंपनीत काम करत होता. या १२ वर्षात न्यूटनने इतकी चांगली कामगिरी केली की, कंपनीने त्याला आपला भागीदार बनवले. याबद्दल बोलताना न्यूटन सांगतो की, मी डोरसेटमध्ये लहानाचा मोठा झालो. माझ्या वडिलांनीही कोणतेही शिक्षण घेतले नव्हते. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी ते सैन्यात शिपाई झाले.

**अचिव्हर**

माझी आई एका पबमध्ये काम करत होती. नंतर ती ट्रॅव्हल एजंट म्हणून काम करू लागली. घरची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसल्यामुळे मला लहानपणापासून पैसे कमवायची गरज लक्षात येत होती.'

अशी पार्श्वभूमी असताना न्यूटनला कॉलेजमध्ये जाण्याची आणि तिथे गणिताचा अभ्यास करण्याची संधी मिळाली होती. पण त्याचवेळी त्याने 'डेलॉइट' कंपनीच्या ब्राइटस्टार्टमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. सध्या तो या कंपनीत ऑडिटर म्हणून काम करतो आणि तो तिथे भागीदारही आहे. खरं तर, त्याला अभ्यासासोबतच काही पैसे कमवायचे होते, जेणेकरून तो शाळेची फी भरू शकेल. म्हणूनच तो प्रथम तशाच संधीच्या शोधात होता. ब्राइटस्टार्ट योजनेची माहिती मिळाली या काळातही त्यांनी नोकरीसाठी अनेक मुलाखती दिल्या होत्या. त्यापैकीच एक डेलॉइटची होती. त्याला डेलॉइटमध्ये नोकरी मिळाली तेव्हा त्याने कंपनीच्या 'स्कूल-लीव्हर' ब्राइटस्टार्ट योजनेत भाग घेतला. आज इथेच तो करोडोंची कमाई करत आहे आणि त्याला त्याच्या निर्णयाचा अभिमान आहे.





# इतिहासाचे साक्षीदार...

तुमच्यातल्या काहींना ऐतिहासिक वास्तूंना, ठिकाणांना भेट देणं कंटाळवाणं वाटत असेल. मात्र ही ठिकाणं आपल्या इतिहासाची साक्षीदार असतात. आपल्या देशातल्या वीरांनी गाजवलेल्या शौर्याच्या कथा ऐकून अंगावर रोमांचं उभे राहतात. मात्र अशा ठिकाणी जाताना काही टिप्स फॉलो करायला हव्या. यामुळे तुमचा भटकंतीचा अनुभव सुखद ठरू शकतो.

✻ तुम्ही निवडलेल्या ऐतिहासिक ठिकाणाची माहिती करून घ्या. आज इंटरनेटमुळे एका क्लिकवर तुम्ही व्हर्च्युअली एखाद्या ठिकाणी पोहचू शकता. वाचनाची आवड असेल तर पुस्तकांमधूनही संबंधित ऐतिहासिक ठिकाणाविषयी जाणून घेता येईल.

✻ ऐतिहासिक स्थानी जाण्याआधी तिथल्या वातावरणाविषयी जाणून घ्या. उन्हाळ्यात फिरायला जात असाल तर सुती आणि मोकळेढाकळे कपडे घालून फिरा. यामुळे तुम्हाला फार त्रास होणार नाही. संबंधित ठिकाणच्या वातावरणानुसार तयारी केली तर फिरण्याचा आनंद द्विगुणित होईल.

**भटकंती**

✻ प्राचीन ठेवा, ऐतिहासिक वास्तूंची जपणूक करायला हवी. त्यामुळे तिथल्या नियमांसंबंधी माहिती करून घ्या.

✻ अशा ठिकाणी गाईड्सची सेवा उपलब्ध असते. ऐतिहासिक ठिकाणी नुसतं फिरण्यापेक्षा तिथली माहिती योग्य माणसाकडून जाणून घ्या. काही गाईड्स खूप सुंदर वर्णन करतात. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांशी संबंधित ऐतिहासिक ठिकाणी पोवाडे गात राजांची महती सांगितली जाते. अशा ठिकाणी खूप छान वाटतं. तुम्हीही हा अनुभव घेऊन बघा.

✻ ऐतिहासिक ठिकाणी सुरक्षा व्यवस्था कडक असते. त्यामुळे फार सामान नेऊ नका. छोटीशी बॅग पाठीवर अडकवा आणि निघा. सोबत पाणी न्यायला विसरू नका.

## फंडू एसएमएस


हम सब एक दुसरे के बिना
कुछ नहीं है,
यही रिश्तों की खूबसूरती है।

हुकुमत की है हमने कोई लूट नहीं,
वो निलाम भी हुए, तो आखरी
बोली हमारी रहेगी।

हराना है तो मैदान में
आके हराना,
वरना दिल जीतने की
आदत
तो बचपन से है।

## बी अॅलर्ट

### 'स्क्रीन टाईम' कमी करा



स्मार्टफोन, कॉम्प्युटर स्क्रीनच्या सततच्या वापरामुळे डोळ्यांवर ताण येतो हे आपण बरेचदा ऐकलं आहे. मात्र याकडे आपलं दुर्लक्ष होतं. याबाबत सातत्याने संशोधन सुरू असून टॉलेडोतल्या एका विद्यापीठाने केलेल्या संशोधनातून धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. आपण याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. स्मार्टफोन किंवा कॉम्प्युटर स्क्रीनवर सतत डोळे लावून बसणाऱ्या माणसांची दृष्टी पन्नाशीपर्यंत अधू होऊ शकते, असं हे संशोधन सांगतं. त्यामुळे आपला 'स्क्रीन टाईम' कमी करण्यावर भर द्यायला हवा.

## व्हॉट्स न्यू?

### आयफोन १६ सीरीज

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही अॅपल आपली आयफोन सीरीज लॉन्च करत आहे. आयफोन १६ सीरीज या वर्षी सप्टेंबरमध्ये लॉन्च होईल. पण लॉन्च होण्यापूर्वीच नवीन आयफोनचे अनेक फिचर्स आणि डिझाइन लीक झाले आहेत. आता डिझाईनबाबतचे मीम्सही व्हायरल होत आहेत. आयफोन ११ आणि आयफोन १२ वापरकर्ते याबद्दल खूप उत्सुक आहेत. यावेळी कंपनी डिस्प्लेमध्ये पूर्वीपेक्षा कमी बेझल वापरणार आहे. आयफोन १६ सीरीजमध्ये डायनॅमिक आयलंड देखील दिसणार आहे. नवीन आयफोनमध्ये आणखी एक खास कॅमेरा शटरसाठी समर्पित असणारे बटण असेल. हे नवीन बटण वापरकर्त्यांना कितपत आवडते हे पाहणे मनोरंजक ठरेल.




## चर्चेत

### टोयोटा फॉर्च्युनरचे 'लीडर एडिशन'

नुकतेच टोयोटा किर्लोस्कर मोटरने भारतातील सर्वात लोकप्रिय टोयोटा फॉर्च्युनरचे लीडर एडिशन समोर ठेवले आहे. या जपानी कार निर्मात्या कंपनीने नियमित मॉडिलच्या तुलनेत कॉस्मेटिक बदल आणि काही नवीन वैशिष्टांसह फॉर्च्युनरची लीडर एडिशन सादर केली आहे. ही लीडर एडिशन खास असून वायरलेस चार्जर, टायर प्रेशर मॉनिटरिंग सिस्टम आणि ऑटो-फोल्डिंग मिरर यासारख्या प्रगत बाबींनी सुसज्ज आहे. कंपनीने त्याचे बुकिंग सुरू केले असून इच्छुक खरेदीदार अधिकृत वेबसाइट किंवा डीलरशिपला भेट देऊन ते बुक करू शकतात.



# त्याचं प्रेम टिकेल ना?

माझा प्रियकर भारतीय लष्करात अधिकारी आहे. गेल्या आठ वर्षांपासून आम्ही लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये आहोत. पण आता माझ्याच शहरात त्याचं पोस्टिंग होणार आहे. अर्थात यामुळे आम्हाला काही काळ एकत्र घालवता येणार असला तरी सततच्या सहवासामुळे त्याला माझ्याविषयी वाटणारं प्रेम कमी होईल की काय, अशी मला भीती वाटते. त्याला मी आवडेनाशी झाले तर, या विचाराने मी खूप अस्वस्थ झाले आहे. मला मदत करा.



**मॅच मेकिंग**

**उत्तर :** गेली आठ वर्षं तुम्ही तुमचं हे नातं जपलं आहे. तुमच्यात अनोखे बंध तयार झाले आहेत. लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये एवढा काळ घालवल्यानंतर एकत्र आल्याने काय होईल, अशी भीती अगदी रास्त आहे. तुम्ही एकाच शहरात राहून एकमेकांची स्पेस जपली तर कोणतीही अडचण येणार नाही. नात्यापलीकडचं आयुष्य जपण्यासाठी तुम्ही दोघांनीही एकमेकांना स्पेस आणि वेळ देणं गरजेचं आहे. संवादाचे सर्व मार्ग खुले ठेवा.

एकमेकांशी मोकळेपणाने बोला. मनात काहीही ठेऊ नका. एकमेकांवर हक्क गाजवणं, गरजेपेक्षा जास्त काळजी करणं टाळा. यामुळे एकत्र असतानाही तुम्ही तुमच्या नात्यातलं वेगळेपण टिकवून ठेऊ शकाल. तुमचं नातं एकसुरी होणार नाही आणि प्रत्यक्ष सहवासामुळे तुमच्या नात्याचे बंध अधिक घट्ट होतील. त्यामुळे कोणतीही धास्ती न बाळगता या नव्या बदलाला सामोरी जा.

# टोप्यांच्या दुनियेत...

मित्रांनो, उन्हाळ्यात डोक्यावर टोपी हवीच. मुलांच्या अॅक्सेसरींमध्ये टोपीला या दिवसात खूप महत्त्व असतं. पण ही टोपी आता साधीसुधी राहिलेली नाही. विविध प्रकारच्या, आकाराच्या फॅन्सी टोप्या ट्रेंडमध्ये आहेत. टोप्यांचे हे वैविध्यपूर्ण प्रकार तुम्हाला गोंधळात टाकू शकतात. मात्र पेहरावानुसार टोपीची निवड करायची आहे हे लक्षात ठेवा. तुम्ही वापरणार असलेल्या पेहरावाला शोभणारी टोपी असेल तर नो टेन्शन.





**फॅशन पॅशन**

बाजारात नजर टाकली तर बेसबॉल कॅप्स, फाईव्ह पॅनल कॅप्स, ड्रायव्हर सीट कॅप्स, ट्रकर्स कॅप अशा कॅप्सच्या भरपूर व्हरायटी पहायला मिळतील. बेसबॉल कॅप्स गेल्या अनेक वर्षांपासून वापरात आहेत. बेसबॉल या खेळामुळे १९०० व्या शतकापासूच या प्रकारच्या कॅप्सना लोकप्रियता मिळाली. त्यामुळे ही कॅप मुलांच्या वॉर्डरोबचा अविभाज्य भाग झाली. या स्टाईलला थोडं ट्विस्ट देऊन डॅड कॅप्स बाजारात आल्या.



बेसबॉल कॅपच्या तुलनेत डॅड कॅपच्या पुढच्या भागाची लांबी थोडी कमी असते. एवढाच काय तो या दोहोंमधला फरक.

फाईव्ह पॅनल ही स्केटर्सची आवडती कॅप आहे. पण ती घालण्यासाठी तुम्ही स्केटर असणं गरजेचं नाही. प्लेन टी शर्ट आणि ट्राउझरवर ती शोभून दिसते. बऱ्याच सेलेब्जना ड्रायव्हर स्टाईल कॅप आवडते. अॅथलेटिक लूकसाठी तुम्ही ट्रकर्स कॅप घालू शकता. मग कॅप्समधली एवढी व्हरायटी बघून तुम्ही थक्क झालात ना? शॉपिंगला गेल्यावर एखादी ट्रेंडी कॅप नक्की विकत घ्या.

## काळजी घ्या

### सावध असा



घरात कार असेल तर कार विमा घ्यावाच लागतो. मात्र तो कायदेशीर आणि वैध आहे हे ओळखणे गरजेचे आहे. कार विमा घोटाळा हा बनावट विमा कंपन्या, फसवे एजंट किंवा मध्यस्थांकडून केला जातो. हे लोक बाजारदरापेक्षा खूपच कमी किमतीत कारचा विमा उतरवण्याचे आमिष देतात. त्यामुळे लोक सहज त्यांच्या जाळ्यात येतात आणि विमा काढतात. हे फसवे लोक मालकांना बनावट वाहन विमा देतात. ही फसवणूक झाल्याचे कार मालकांच्या लक्षातही येत नाही. ते विम्याचा वार्षिक हप्ता भरतात. मात्र अचानक वाहन चोरीला गेल्यावर किंवा अपघात झाल्यास विमा कंपनीकडून भरपाई मिळणे आवश्यक असताना ही फसवणूक उघडकीस येते. म्हणूनच याबाबत सावध राहणे गरजेचे आहे.

# झटपट बनवा ब्रेडचा उपमा

दोस्तांनो, तुम्ही झटपट बनवता येणारे पदार्थ शोधत असता. काहीतरी वेगळं तुम्हाला हवं असतं. आपण उरलेल्या पदार्थांचा वापर करूनही झटपट नाश्ता बनवू शकतो. ब्रेड किंवा पाव उरला असेल तर त्यापासून पावाचा चिवडा किंवा उपमा तयार करता येईल. अगदी पाच मिनिटांत होणारी ही रेसिपी आहे.

**सामग्री**: ब्रेड स्लाईस किंवा पाव चिरलेला कांदा आणि टॉमेटो, हळद, हिंग, तिखट, मोहरी, तेल आणि चवीनुसार मीठ

**झटपट रेसिपी**

**कृती:** ब्रेड स्लाईसचे छोटे तुकडे करून घ्या. आता एका कढईत थोडं तेल घाला. गरम झाल्यावर मोहरी, हिंग आणि हळद घाला. मोहरी तडतडल्यानंतर कांदा घालून परतून घ्या. त्यात टॉमेटो घाला. मऊ शिजल्यानंतर ब्रेड घालून नीट हलवून घ्या. चवीनुसार मीठ घाला. पुन्हा हलवून घ्या. गरमगरम खा.



# असा आहे नेट्रेक्स

नॅशनल ऑटोमोटिव्ह टेस्ट ट्रॅक (नेट्रेक्स) हा आशियातील सर्वात लांब हाय स्पीड वाहन चाचणी ट्रॅक असून जगातील पाचवा सर्वात मोठा आहे. तो अंडाकृती आकाराचा आणि चार मुक्त मार्गांसह १६ मीटर रुंद आहे. हा टेस्ट ट्रॅक म्हणजे आधुनिक अभियांत्रिकीचे एक आश्चर्य असून याद्वारे जास्तीत जास्त वेग केवळ दुचाकी आणि कारसाठीच नव्हे तर ट्रॅक्टर आणि ट्रेलरसाठी देखील सेट केला जाऊ शकतो. त्यामुळे युवा मित्रांनो, तुम्ही याची माहिती घ्यायलाच हवी.

मध्य प्रदेशातील इंदूरपासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या पिथमपूरमध्ये बनवलेले हे नेट्रेक्स एक हजार एकर परिसरात पसरलेला आहे. तुम्हाला वाचून आश्चर्य वाटेल की, एवढ्या प्रशस्त आवारात २० पेक्षा जास्त महाल बांधले जाऊ शकतात. १४ चाचणी ट्रॅक आणि अनेक चाचणी तंत्रज्ञानासह, नेट्रॅक्समध्ये अशी सर्व आधुनिक वैशिष्ट्ये आहेत जी वाहनांची श्रेणी वाढवण्यास मदत करतात. या ११.३ किलोमीटर लांबीच्या हायस्पीड टेस्ट ट्रॅकवर ताशी ३७५ किलोमीटर वेगाने वाहनाची चाचणी घेता येते. नेट्रॅक्स मधील कामगिरीचे पूर्णपणे मूल्यमापन करण्यासाठी, वाहनांना कठोर चाचण्यांच्या मालिकेतून जावे लागते. या सर्व चाचण्यांसाठी येथे स्वतंत्र ट्रॅक तयार करण्यात आला असल्यामुळे हायस्पीड असो किंवा कोणतीही स्वयंचलित चाचणी, आता कंपन्यांना इतर कोणत्याही देशात जाण्याची गरज नाही. येथे एकूण चार ट्रॅकच्या माध्यमातून काम होते.

**जाणून घ्या**



त्यातील एका ट्रॅकवर वाहनाच्या टिकाऊपणाची चाचणी घेतली जाते. याचा निष्कर्ष वाहन किती टिकाऊ आहे ते सांगतो. ग्रेडियंट ट्रॅकमध्ये वाहनाची टॉर्क क्षमता आणि उतारावर पार्किंग ब्रेकची क्षमता तपासली जाते. सस्टेनेबिलिटी ट्रॅक हे डोंगराळ रस्त्यांवर चालवण्यासारखे डिझाइन केले गेले आहे. त्याचबरोबर या ट्रॅकवर वाहनाच्या कूलिंग कार्यक्षमतेची चाचणी देखील येथे केली जाते. डायनॅमिक ट्रॅक प्लॅटफॉर्मद्वारे वाहनाची हाताळणी आणि स्थिरता तपासली जाते. ही चाचणी अचूक होण्यासाठी योग्य ते डिझाइन केले गेले आहे.

# परदेशातून एमबीबीएस करायचं आहे?

बारावीनंतर अनेकांना मेडिकल सायन्स म्हणजे वैद्यकीय शाखेकडे वळायचं असतं. भारतात नीट परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळतो. पण नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लाखोंमध्ये असताना जागा मात्र काही हजार असतात. यामुळे बरेच विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. अशा परिस्थितीत परदेशातून वैद्यकीय शिक्षण घेण्याचा एक पर्याय तुमच्याकडे आहे. या पर्यायाची निवड करताना नेमक्या कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावं याविषयी...

✻ परदेशातलं शिक्षण तुमच्या करीअरला वेगळं वळण देऊ शकतं. तिथले अनुभव तुम्हाला समृद्ध करत असतात. विकसित देशांमधून वैद्यकीय अभ्यासक्रम शिकून आलेल्या विद्यार्थ्यांना विविध विकारांचं चांगलं ज्ञान मिळू शकतं.



अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी अवगत होता येतं.

**वेगळ्या वाटा**

✻ भारतीय विद्यार्थ्यांना काही देशांमध्ये वैद्यकीय प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागत नाही तर काही ठिकाणी याची तरतूद आहे. अमेरिका, न्यूझीलंड, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, कॅनडा, मलेशियासारख्या देशांमध्ये प्रवेश परीक्षा द्यावी लागते. चीन, जर्मनी, फिलिपाईन्स, नेपाळ, युक्रेन, बांग्लादेश, रशिया, किर्गिझस्तानसारखे देश विद्यार्थ्यांना थेट प्रवेश देतात.

✻ परदेशात एमबीबीएस करण्याचा विचार असेल तर सर्वात आधी इंटरनेटवरून विविध देशांमधल्या अभ्यासक्रमांची माहिती करून घ्या. तिथली प्रवेशप्रक्रिया समजून घ्या. समुपदेशकाची मदतही घेता येईल.

✻ परदेशातल्या बऱ्याच संस्था मान्यताप्राप्त नसतात. यामुळे तुमची फसवणूक होऊ शकते. म्हणूनच आपण प्रवेश घेत असलेल्या संस्थेची मान्यता तपासून बघा.

✻ मेडिकलच्या क्षेत्रात प्रात्यक्षिकांना खूप महत्त्व असतं. पण बरीच परदेशी मेडिकल कॉलेज याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्यांची नियमावली, माहितीपुस्तिका नीट वाचून मगच निर्णय घ्या.

